# कोविड-१९ लॉकडाऊन वंचित वर्गातील लोकांचे अधिकार आणि शासकीय योजनांची माहिती



यूथ फॉर यूनिटी एंड वोलंटरी एक्शन (युवा)

| अ.क्र. | योजनांची नावे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रधानमंत्री शेतकरी योजना | ३ |
| २. | प्रधानमंत्री जन-धन योजना | ३ |
| ३. | प्रधानमंत्री उज्वला योजना | ३ |
| ४. | प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना | ४ |
| ४. | महाराष्ट्र शासन- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ४ |
| ५. | बांधकाम तोडण्याच्या आणि घर खाली करण्याच्या निर्णयाला स्थगिती | ५ |
| ६. | बृहन्मुंबई महानगरपालिकेचा हेल्पलाईन क्रमांक | ५ |
| ७. | वाढीव दराने वस्तु विक्री, रेशन दुकानावर साहित्य न मिळणे व इतर स्वरुपाच्या समस्यांसाठी मंत्री कार्यालय संपर्क क्रमांक (२४ तास मदतकार्य) | ६ |
| ८. | बेघर, विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी निवारागगृह, अन्नधान्य व भोजन व्यवस्थेबाबत करावयाच्या तातडीच्या उपाययोजना. | ७ |
| ९. | कम्युनिटी किचनची सुविधा उपलब्ध करून देणे. | ८ |
| १०. | घर भाड़े वसूली किमान तीन महीने पुढे ढकलावी. | ९ |
| ११. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणीकृत सक्रीय बांधकाम कामगारांना कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भाव कालावधीत अर्थसहाय्य देणेबाबत. | १० |
| १२. | अडकलेले मजूर, विद्यार्थी घरी जाणार – केंद्रीय गृहमंत्रालयाकडून सूचना. | १० |
| १३. | कामगारांसाठी केलेल्या कायद्यातील महत्वपूर्ण बदल | ११ |
| १४. | एक राष्ट्र - एक रेशन कार्ड | १२ |
| १५. | स्थलांतरित कामगार / शहरी गरीबांसाठी परवडणारे भाडे निवासी कॉम्प्लेक्स (एआरएचसी) | १३ |
| १६. | पथ विक्रेत्यांसाठी विशेष पत (क्रेडिट) सुविधा | १४ |
| १७. | महात्मा फुले जन आरोग्य योजना | १५ |
| १८. | स्थलांतरित मजुरांकडून रेल्वे अथवा बसचे भाड़े घेऊ नका | १६ |
| १९. | विना शिधापत्रिकाधारक व्यक्तिंना राशन | १७ |

## केंद्र शासनाच्या योजना

- **प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना / प्रधानमंत्री शेतकरी योजना**

**देखरेखिस जबाबदार - बँक, लाभार्थी, तलाठी**

| | |
|---|---|
| **काय मिळेल ?** | शेतकऱ्यांना २०००/- रुपयांची आगाऊ रक्कम |
| **कोणाला मिळेल?** | त्या शेतकऱ्यांना मिळेल जे प्रधानमंत्री शेतकरी योजनेच्या अंतर्गत हक़दार आहेत आणि ज्यांचे आधार कार्ड बँक खात्याशी जोडले आहे. |
| **कसं मिळेल?** | सरळ बँकेत जमा होतील. |
| **कधी मिळेल?** | एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात |

- **प्रधानमंत्री जन – धन योजना**

| | |
|---|---|
| **काय मिळेल ?** | ५०० रुपये |
| **कोणत्या महिन्यात?** | माहे एप्रिल, मे आणि जून |
| **कोणाच्या खात्यात येणार पैसे?** | प्रधानमंत्री जन – धन योजनेच्या अंतर्गत असणाऱ्या BPL महिलांच्या खात्यात |

- **प्रधानमंत्री उज्वला योजना (भारत सरकार, २७ मार्च २०२०, निर्मला सीतारमण)**

| | |
|---|---|
| **या सुविधेचा लाभ कसा ?** | एप्रिल ते जून दरम्यान तीन गैस सिलेंडर विनामुल्य दिले जातील. |
| **कोणाला लाभ मिळू शकेल?** | प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत एल.पी.जी. कनेक्शन असणारी कुटुंबे |



## प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

- **प्रति व्यक्ति ५ किलो तांदुळ मोफत**

| | |
|---|---|
| **काय मिळेल?** | प्रति व्यक्ति ५ किलो तांदुळ मोफत |
| **कोणाला मिळेल?** | राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत येणारी कुटुंबे |
| **कसं मिळेल?** | स्थानिक सार्वजनिक वितरण व्यवस्थेतुन |
| **कधी मिळेल?** | माहे एप्रिल, मे आणि जून |

- **महाराष्ट्र शासन- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन, शासन निर्णय**

| | |
|---|---|
| **काय मिळेल?** | अन्नधान्य |
| **कोणाला मिळेल?** | राष्ट्रीय योजने अंतर्गत समाविष्ट नसलेल्या ए.पी.एल. (केशरी राशन धारकांसाठी) |
| **कसं मिळेल?** | स्थानिक सार्वजनिक वितरण व्यवस्थेतुन (सवलतीच्या दराने) |
| **कधी मिळेल?** | माहे मे आणि जून |

- **केशरी कार्ड धारकांसाठी (मे आणि जून महिन्याकरिता)**

| | |
|---|---|
| **काय मिळेल ?** | कोणत्या दराने |
| **३ किलो गहू (प्रति व्यक्ती )** | ८ रु. प्रति किलो. |
| **२ किलो तांदुळ (प्रति व्यक्ती)** | १२ रु. प्रति किलो. |



## बांधकाम तोडण्याच्या आणि घर खाली करण्याच्या निर्णयाला स्थगिती

- **बांधकाम तोडण्याच्या आणि घर खाली करण्याच्या निर्णयाला स्थगिती**

| | |
|---|---|
| **स्थगिती कोणी दिली?** | मुंबई उच्च न्यायालय |
| **कोणाला दिली?** | राज्यातील सर्व महानगरपालिकांना |
| **किती तारखेपर्यंत** | १५ जूनपर्यंत |

- **बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मदतकार्य संपर्क (हेल्पलाईन) क्रमांक**

| | |
|---|---|
| **कोणासाठी?** | बेघर/कामगार/अडकलेल्या इतर प्रांतातील व्यक्तींसाठी |
| **संपर्क क्रमांक** | १८००२२१२९२ |
| **वेळ :** | सकाळी ९.०० ते रात्री ९.०० |



## वाढीव दराने वस्तु विक्री, रेशन दुकानावर साहित्य न मिळणे व इतर स्वरुपाच्या समस्यांसाठी मंत्री कार्यालय संपर्क क्रमांक (२४ तास मदतकार्य)

**(संदर्भ – सकाळ वर्तमानपत्र, नाशिक, दिनांक: ३० मार्च २०२०)**

| अ. क्र. | नावं | पद/विभाग | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | **छगन भुजबळ** | मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक सरक्षण | ९९३०३३९९९९ |
| २) | **संतोषसिंग परदेशी** | खासगी सचिव | ९८७७०३३६५६० |
| ३) | **अनिल सोनवणे** | विशेष कार्य अधिकारी | ९७६६१५८१११ |
| ४) | **महेंद्र पवार** | विशेष कार्य अधिकारी | ७५८८०५२००३ |
| ५) | **महेश पैठणकर** | स्वीय सहाय्यक | ७८७५२८०९६५ |



# बेघर, विस्थापित कामगार, परराज्यातील अडकलेले कामगार यांच्यासाठी निवारागगृह, अन्नधान्य व भोजन व्यवस्थेबाबत करावयाच्या तातडीच्या उपाययोजना

| अ.क्र. | समिती नावं | जबाबदारी |
|---|---|---|
| १) | जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती | जिल्हाधिकारी |
| २) | महानगरपालिका स्तरीय सनियंत्रण समिती | महापालिका आयुक्त |

**राज्यस्तरीय सनियंत्रण समिती (अंमलबजावणीसाठी)**

| अ.क्र. | विभाग | पद |
|---|---|---|
| १) | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २) | अप्पर मुख्य सचिव (महसूल) | सदसय |
| ३) | अप्पर मुख्य सचिव (नगरविकास) | सदस्य |
| ४) | प्रधान सचिव (अन्न व् नागरी पुरवठा) | सदस्य |
| ५) | प्रधान सचिव (सहकार) | सदस्य |
| ६) | प्रधान सचिव (कामगार) | सदस्य |
| ७) | सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) | सदस्य – सचिव |


### जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती खालीलप्रमाणे कार्यवाही करेल

१) जिल्ह्यातील विविध भागांमध्ये विविध घटकातील जीवनावश्यक सुविधा उपलब्ध न झालेले मजूर, विस्थापित व बेघर व्यक्ती यांची निश्चिती करणे.

२) सदर गरजू व्यक्तिंची तालुकानिहाय व भागनिहाय यादी तयार करणे.

३) या यादीच्या आधारावर तालुकानिहाय आणि भागनिहाय लागणारी अन्नधान्याची आवश्यकता व उपलब्धता निश्चित करणे.

४) सर्व जिल्हाधिकारी यांनी स्थापित केलेल्या जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक तातडीने प्रसिद्ध करावेत.




## कम्युनिटी किचनची सुविधा उपलब्ध करून देणे

१) लॉकडाऊनच्या कालावधीत विस्थापित झालेले मजूर, बेघर व्यक्ती यांच्यासाठी तातपुरत्या स्वरूपात कम्युनिटी किचन सुरु करण्याकरिता ठिकाण निश्चित करण्यात यावे, जसे की, नजीकच्या जिल्हा परिषद्/महानगरपालिका शाळा व विद्यालये, सार्वजनिक मैदाने, समाजमंदिर, खाजगी मंगल कार्यालये, धार्मिक प्रार्थनास्थळे/संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आवारातील लीलावगृहे, औद्योगिक वसाहती इत्यादी ठिकाणी आवश्यकतेनुसार करण्यात यावी.

२) सदरची सुविधा ही राज्यातील लॉकडाऊनमुळे उदरनिर्वाहाची साधने संपुष्टात आलेले राज्यातील/परराज्यातील विस्थापित कामगार, निराश्रित व्यक्ती, प्रवासादरम्यान अडकलेल्या व्यक्ती इत्यादीना लागु राहील. याकरिता त्यांचेकडून रेशन कार्ड किंवा ओळखपत्र तपासण्याची आवश्यकता नाही. या सुविधांपासून कोणीही गरजू व्यक्ती वंचित राहणार नाही याची खातरजमा करावी.

३) महानगपालिका क्षेत्रामध्ये उपरोक्त सर्व बाबिंचे नियोजन वार्डनिहाय सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत आयुक्त महानगपालिका यांनी पार पाडावे.



## घर भाड़े वसूली किमान तीन महीने पुढे ढकलावी

**(संदर्भ – महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, दिनांक: १७ एप्रिल २०२०)**

**या लॉकडाऊनमुळे सर्व बाजारपेठा, व्यावसायिक संस्था, कारखाने व एकुणच सर्व आर्थिक/व्यावसायिक गतिविधी बंद आहे. याचा सर्वसामान्य जनतेच्या रोजगारावरही परिणाम झाल्याने अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधन बंद झालेले आहे.**

**१) का घेतला निर्णय –**


राज्यात भाड्याच्या घरात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण लक्षणीय असून वर नमूद आर्थिक अडचणीच्या परिस्थितीमुळे भाड़ेकरुना ते राहत असलेल्या घरांचे भाड़े नियमितरित्या भरणे शक्य होत नाही व भाड़े थकत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

**२) तीन महीने घर भाड़े वसूली पुढे ढकलली.**

भाड़े न दिल्याने कोणत्याही भाडेकरूला भाड्याच्या घरातून निष्कासित करण्यात येऊ नये, अशा सुचना राज्यातील सर्व घर मालकांना देण्यात आल्या आहेत.

**३) कोणत्या महिन्यात भाड़े वसूली नाही –**

एप्रिल, मे आणि जून




## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणीकृत सक्रीय बांधकाम कामगारांना कोविड-१९ विषाणुच्या प्रादुर्भाव कालावधीत अर्थसहाय्य देणेबाबत...

**(संदर्भ – महाराष्ट्र शासन, उद्योग,उर्जा व कामगार विभाग, दिनांक : १८एप्रिल २०२०)**

| | |
|---|---|
| **कोणाला मिळणार?** | राज्यातील इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या नोंदणीकृत सक्रीय बांधकाम कामगारांना |
| **काय मिळणार?** | प्रत्येकी रु. २००० /- |
| **कसे मिळणार पैसे?** | कामगारांच्या बँक खात्यात थेट (DBT) |

**अडकलेले मजूर, विद्यार्थी घरी जाणार – केंद्रीय गृहमंत्रालयाकडून सूचना**

| | |
|---|---|
| **कोणास परवानगी?** | मजूर, प्रवासी, तीर्थयात्री, पर्यटक आणि विद्यार्थी |
| **कोणाच्या हस्तक्षेपाने?** | नोडल अधिकारी |
| **कशाने जाता येणार ?** | बसने (शारीरिक अंतर राखून) |



## कामगारांसाठी केलेल्या कायद्यातील महत्वपूर्ण बदल:

१. असंघटित कामगारांसह सर्व कामगारांच्या किमान वेतनाचे सामान्यीकरण आणि वेळेवर पगाराचे भुगतान

२. केंद्र सरकारने कमीत कमी वेतनाची संकल्पना मांडली आहे.

३. सर्व कामगारांसाठी नियुक्ती पत्राची व्यवस्था

४. व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य कोड धोकादायक ठिकाणी कार्य करणाऱ्या १० पेक्षा कमी कामगार असलेल्या संस्थांना लागू असेल.

५. गीग कामगार, तात्पुरते आणि व प्लेटफ़ोर्म कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा योजना सुरू केली जाईल.

६. असंगठित क्षेत्रातील  कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा निधीची तरतूद.



## एक राष्ट्र - एक रेशन कार्ड

**या योजनेमुळे परप्रवासी लाभार्थींना देशातील कोणत्याही उचित दर दुकानातून सार्वजनिक वितरण प्रणालीत प्रवेश मिळू शकेल.**

**प्रवासी लोकांसाठी २ महिन्यांचा मोफत धान्य पुरवठा**

| | |
|---|---|
| **१. काय मिळेल?** | २ महिन्यांसाठी प्रत्येक व्यक्तीला ५ किलो धान्य आणि प्रत्येक कुटुंबासाठी १ किलो हरभरा |
| **२. कोणाला मिळेल?** | ते स्थलांतरित जे राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याचे लाभार्थी नाहीत किवा त्यांच्याकडे जिथे ते राहत आहेत तेथिल राज्याच्या शिधापत्रिका नाहीत. |
| **३. कसे मिळेल?** | यासाठी राज्य सरकारे ओळख, वितरण आणि अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी करतील |
| **४. कधी मिळेल?** | दोन महिने व खर्च केंद्र सरकार करेल. |



## स्थलांतरित कामगार / शहरी गरीबांसाठी परवडणारे भाडे निवासी कॉम्प्लेक्स (एआरएचसी)

| | |
|---|---|
| **१. काय मिळेल?** | स्थलांतरित कामगार किंवा शहरी गरीबांना भाड्याने घर देण्याची सुविधा. |
| **२. कोणाला मिळेल?** | सरकार सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करेल आणि त्याचे वेळापत्रक ठरवेल. तथापि, सध्या ती प्रधानमंत्री आवास योजनेशी जोडली जात आहे. |
| **३. कसे मिळेल?** | सरकारी-खाजगी भागीदारी द्वारे, शासकीय-अनुदानीत, निवासी संकुले निवासस्थानी रूपांतरित करण्यासाठी |
| **४. कधी मिळेल?** | तपशीलवार मार्गदर्शक सूचना नंतर स्पष्ट होईल परंतु काही प्रकरणांमध्ये ही मर्यादा ६ महिन्यांसाठी ठेवली गेली आहे. |



## पथ विक्रेत्यांसाठी विशेष पत (क्रेडिट) सुविधा

**या योजनेमुळे परप्रवासी लाभार्थींना देशातील कोणत्याही उचित दर दुकानातून सार्वजनिक वितरण प्रणालीत प्रवेश मिळू शकेल.**

**प्रवासी लोकांसाठी २ महिन्यांचा मोफत धान्य पुरवठा**


| | |
|---|---|
| **१. काय मिळेल?** | पथ विक्रेत्यांना प्रारंभिक कार्य भांडवलासाठी १०००० रुपये कर्ज. |
| **२. कोणाला मिळेल?** | राज्य शासनाने बनविलेल्या नियम व योजनांनुसार सुमारे ५० लाख पात्र पथ विक्रेत्यांना |
| **३. कसे मिळेल:** | सरकारने विशेष योजना तयार करण्याबद्दल बोलले आहे, त्यामुळे प्रक्रिया अद्याप निश्चित झालेली नाही |
| **४. कधी मिळेल?** | सरकारने आपली मर्यादा १ महिन्यासाठी ठेवली असून त्यासाठी सुमारे ५,००० कोटी रुपये निश्चित केले आहेत. |



## महात्मा फुले जन आरोग्य योजना (सार्वजानिक आरोग्य विभाग) (२३ मे २०२०)

**प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेशी सलाग्नित**

| | |
|---|---|
| **कोणाला लाभ मिळेल आणि कधीपर्यंत ?** | मर्यादित कालावधीसाठी (३० जलै २०२० पर्यंत राज्यातील सर्व नागरिकांसाठी ) |
| **कुठे आणि कशासाठी लाभ?** | अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये कोविड – १९ साठी उपचार मिळेल तसेच शासकीय रुग्णालयाकरिता राखीव असलेल्या १३४ उपचरांपैकी सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व श्रवणयंत्राचा उपचार वगळता १२० उपचार अंगीकृत खाजगी रुग्णालयांना ३१ जुलै पर्यंत मान्यता प्राप्त दराने देण्यात यावेत. |
| **कागदपत्रे :** | १. लाभार्थ्याला रहिवासी पुरावा म्हणून वैध पिवळे, केशरी, शुभ्र शिधापत्रिका, तहसीलदार यांचा दाखला व आधिवास प्रमाणपत्र यांपैकी कोणतेही कोणताही एक पूरावा. |
| | २. त्याचबरोबर शासनमान्य फोटो ओळखपत्र देणे आवश्यक राहिल. |
| **अंमलबजावणी कोण करेल ?** | राज्य आरोग्य हमी सोसयाटीने करावी. |




## स्थलांतरित मजुरांकडून रेल्वे अथवा बसचे भाड़े घेऊ नका सर्वाच्च न्यायालयाचे अंतिम आदेश (२८ में २०२०)

१. गावी जाण्यासाठी मजुरांच्या तिकिटाचा खर्च सबंधित राज्याने करायचा आहे.

२. मजुरांच्या खाण्या – पिण्याची व्यवस्था सबंधित राज्याने करावी.

३. रस्त्याने चालत जात असलेल्या मजुरांची खाण्याची – पिण्याची आणि प्रवासाची व्यवस्था स्थानिक प्रशासन करेल.

४. मजुरांच्या नोंदणीची प्रक्रिया राज्य सरकार सरळ व सोपी करेल.



## विना शिधापत्रिकाधारक व्यक्तिंना राशन (दिनांक: १९ मे २०२०)
## महाराष्ट्र शासन – अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**आत्मनिर्भर भारत वित्तीय सहाय्य पैकेजअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत किंवा कोणत्याही राज्य योजनेत सामविष्ट नसलेल्या विना शिधापत्रिकधारक व्यक्तिंना माहे मे व जून २०२० या दोन महिन्याच्या कालावधीकरिता प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो तांदुळ मोफत देण्याबाबत मान्यता दिली आहे.**

**लाभार्थ्यांचे निकष :**

१. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेमधिल शिधापत्रिकेसाठी अर्ज केला आहे, परंतु अद्याप पर्यंत शिधापत्रिका प्राप्त न झालेली व्यक्ती.

२. अन्न धान्याची गरज असलेले सामजिक व आर्थिकदृष्टया दुर्वल विस्थापित मजूर, रोजंदारी मजूर

